Peer Reviewed Refereed
and UGC Listed
Journal No. 47100

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X, Issue - I,
August - January - 2021-22
Marathi Part - I

Impact Factor / Indexing
2019 - 6.631
www.sjifactor.com

Ajanta Prakashan

Scanned by CamScanner

ISSN - 2279 - 0489

AN INTERNATIONAL MULTIDISCIPLINARY
HALF YEARLY RESEARCH JOURNAL

# GENIUS

Volume - X Issue - I August - January - 2021-22

MARATHI PART - I

Peer Reviewed Refereed and
UGC Listed Journal No. 47100

ज्ञान-विज्ञान विमुक्तये

IMPACT FACTOR / INDEXING
2019 - 6.631
www.sjifactor.com

❖ EDITOR ❖
Asst. Prof. Vinay Shankarrao Hatole
M.Sc (Maths), M.B.A. (Mktg.), M.B.A. (H.R.),
M.Drama (Acting), M.Drama (Prod. & Dir.), M.Ed.

❖ PUBLISHED BY ❖

Ajanta Prakashan
Aurangabad. (M.S.)

Scanned by CamScanner

The information and views expressed and the research content published in this journal, the sole responsibility lies entirely with the author(s) and does not reflect the official opinion of the Editorial Board, Advisory Committee and the Editor in Chief of the Journal **"GENIUS"**. Owner, printer & publisher Vinay S. Hatole has printed this journal at Ajanta Computer and Printers, Jaisingpura, University Gate, Aurangabad, also Published the same at Aurangabad.


**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

**Printed by**

Ajanta Computer, Near University Gate, Jaisingpura, Aurangabad. (M.S.)

Cell No. : 9579260877, 9822620877 Ph. No. : (0240) 2400877

E-mail : ajanta5050@gmail.com, www.ajantaprakashan.com

**GENIUS - ISSN 2279 - 0489 - Impact Factor - 6.631** (www.sjifactor.com)


Scanned by CamScanner

# EDITORIAL BOARD


**Dr. S. Umesha**
Dept. Of Studies in Biotechnology, University of Mysore, Manasagangotri, Mysore, India.

**Dr. Tharanikkarasu K.**
Dept. Of Chemistry, Pondicherry University (Central University), Kalapet, Puducherry, India.

**Professor Kaiser Haq**
Dept. of English, University of Dhaka, Dhaka 1000, Bangladesh.

**Dr. Altaf Husain Pandit**
Dept. of Chemistry University of Kashmir, Kashmir, India.

**Prof. Avinashi Kapoor**
Head, Dept. Of Electronic Science, Dean, Faculty of Interdisciplinary Sciences, Chairman, Board of Research Studies, South Campus, University of Delhi, New Delhi, India.

**Prof. P. N. Gajjar**
Head, Dept. Of Physics, University School of Sciences, Gujarat University, Ahmedabad, India.

**Dr. Uday P. Dongare**
Head, Dept. Of Physical Education, Shivaji Art's, Commerce & Science College, Kannad, Aurangabad, India.

**Roderick McCulloch**
University of the Sunshine Coast, Locked Bag 4, Maroochydore DC, Queensland, 4558 Australia.

**Dr. K. B. Laghane**
Dean, Faculty of Management Science, Dean, Faculty of Commerce (Dr. B.A.M.U.) Head Commerce Dept., Vivekanad College, Samarth Nager, Aurangabad, India.

**Brian Schiff**
Brussels, Copenhagen, Madrid, Paris.

**Dr. Prashant M. Dolia**
Dept. Of Computer Science & Applications, Bhavnagar University, India.

**Dr. Nicholas Ioannides**
Senior Lecturer & Cisco Networking Academy Instructor, Faculty of Computing, North Campus, London Metropolitan University, 166-220 Holloway Road, London, N7 8DB, UK.

**Dr. Hanumanthappa J.**
Dept. Of Studies In Computer Science, University of Mysore, Manasagangotri, Mysore-570 006, Karnataka, India.

**Dr. Asharf Fetoh Eata**
College of Arts or Science Salmau Bin Adbul Aziz University, KAS.

**Dr. Kailas Thombre**
Research Guide, Dept .of Economics Deogiri College, Aura..gabad, India.

**Dr. Isita Lahiri**
Dept. of Business Administration, University of Kalyani, Kalyani West Bengal.


Scanned by CamScanner

# CONTENTS OF MARATHI PART - I



| अ.क्र. | लेख आणि लेखकाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| २२ | आर्थिक पर्यावरण<br>**श्रीमती मनिषा वासुदेव चौधरी** | ११५-११७ |
| २३ | Covid-19 नंतर बदलते भारतीय कृषी क्षेत्र<br>**डॉ. ज्योती पवार** | ११८-१२२ |
| २४ | नाशिक जिल्ह्यातील कृषी क्षेत्रावर कोवीड-१९ चा परिणाम<br>**डॉ. बी. एम. सोनवणे** | १२३-१२५ |
| २५ | मालेगाव (नाशिक) तालुक्यातील कला-मनोरंजन क्षेत्रातील कोविड -१९ चा परिणाम<br>**प्रा. डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर** | १२६-१२९ |
| २६ | ओटीटी ॲप सिनेमा माध्यमातील नवा प्रवाह<br>**लक्ष्मीकांत साळूबा जाधव** | १३०-१३३ |
| २७ | कोविड-१९ रोजगारावरील परिणाम आणि उपलब्ध संधी<br>**प्रा. राहुल लक्ष्मणराव लिंगम्पल्ले**<br>**प्रा. डॉ. एम. एम. गायकवाड** | १३४-१३७ |
| २८ | कोरोना आणि भारतीय कृषी अर्थव्यवस्था<br>**प्रा. डॉ. आर. पी. पाटील**<br>**जनार्दन जानजी देवरे** | १३८-१४२ |
| २९ | महाराष्ट्रातील रासायनिक खते व किटकनाशकांचा वाढता वापर : मानवी आरोग्य आणि पर्यावरण<br>**लखन देविचंद सुर्यवंशी** | १४३-१४८ |





Scanned by CamScanner

VOLUME - X, ISSUE - I - AUGUST - JANUARY - 2021-22
GENIUS - ISSN - 2279 - 0489 - IMPACT FACTOR - 6.631 (www.sjifactor.com) AP-10

# २५. मालेगाव (नाशिक) तालुक्यातील कला-मनोरंजन क्षेत्रातील कोविड - १९ चा परिणाम

**प्रा. डॉ. अर्जुन गंगाराम नेरकर**
सहाय्यक प्राध्यापक, मराठी विभाग म.स.गा. महाविद्यालय मालेगाव कॅम्प, मालेगाव - जि. नाशिक.

## प्रस्तावना

मानवी जीवनात कला-मनोरंजनाला अनन्य साधारण महत्व आहे. आजच्या माहिती तंत्रज्ञान व हायटेक तंत्रज्ञानाच्या युगात समाजात नैराश्य वाढत असल्याचे निदर्शनास येते. तसेच कामाचा अतिरिक्त ताण-तणाव यामुळे सामाजिक व कौटुंबिक कलहाचे प्रमाणदेखील वाढत चालले आहे. आजच्या अशा हायटेक तंत्रज्ञानाच्या युगात जग हे इलेक्ट्रॉनिक्स संसाधनांच्या द्वारे जोडले जात आहे. पण या प्रक्रियेत मानव समुदाय एकमेकांपासून मनाने दुरावत चालला आहे. हे वास्तव सत्य जवळपास सगळ्यांना कमी-अधिक प्रमाणात अनुभवास येत आहे. यात भर घातली कोविड-१९ या संसर्गजन्य विषाणूने."वॉल स्ट्रीट जनरल' या अमेरिकेतील वृत्त प्रकाशित करणाऱ्या वृत्तसंस्थेने जगामध्ये कोविड-१९ या विषाणूचा निसर्ग चीनमधील वुहान प्रांतांमधून १० डिसेंबर २०१९ पासून बसरला"[१]

कोविड-१९ हा संसर्गजन्य विषाणू 'कोरोना' या नावाने देखील संबोधला जातो. या संसर्गजन्य विषाणूने दोन ते तीन महिन्यात १५० जास्त देशांमध्ये शिरकाव केला आणि मोठ्या प्रमाणात जीवित हानी देखील या संसर्गाने झाली. यामुळेच जागतिक आरोग्य संघटनेने या कोरोना विषाणूचा संसर्ग 'जागतिक महामारी' म्हणून घोषित केले. भारतात कोरोनाचा शिरकाव चीनमधून झाला. "चीनमधील वुहान विद्यापीठात मेडिकलच्या तिसऱ्या वर्षात शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्याला या संसर्गाची लागण झालेली होती. ही विद्यार्थीनी भारतातील केरळ राज्याची रहिवासी होती. सुट्टीच्या कालावधीत घरी आल्यावर तिचा कोरोना रिपोर्ट ३० जानेवारी २०२० रोजी पॉझिटिव्ह आला."[२] " महाराष्ट्रात हा संसर्ग ९ मार्च २०२० रोजी आढळून आला. पुण्यातील एका व्यक्तीचा कोरोना अहवाल पॉझिटिव आला".[३] आणि बघता बघता संपूर्ण महाराष्ट्र कोरोनाच्या विळख्यात सापडला. कोरोनाचा वाढता धोका विचारात घेऊन केंद्र शासनाने मार्च महिन्याच्या २२ तारखेला एका दिवसासाठी "जनता कर्फ्यू" घोषित केला. देशातील सर्व स्तरातील घटकांनी या जनता कर्फ्यूला उत्स्फूर्तपणे प्रतिसाद दिला. यानंतर २५ मार्च २०२० पासून संपूर्ण भारतात लॉकडाउन लागू करण्यात आला"[४]

संपूर्ण भारतातील रस्ते, वर्दळीची ठिकाणे, उद्योग व्यवसाय सेवा, या सगळ्या ठिकाणी स्मशान शांतता पसरली. आपला जीव कोरोना संसर्गापासून वाचावा यासाठी सर्व क्षेत्रातील व्यक्तींनी स्वतःला घरामध्ये कोंडून घेतले. यावेळी प्रत्येकाला आपला जीव वाचावा असेच वाटत होते. परंतू बहुतांश कुटुंबातील



Scanned by CamScanner

खाद्यपदार्थ, पैसे संपल्यावर मात्र लॉक डाउन नकोसे वाटू लागले. या कोरोना मुळे ही बिकट परिस्थिती ओढवली. या कोरोना संसर्गामुळे नाशिक जिल्ह्यातील मालेगाव तालुक्यात कला-मनोरंजन क्षेत्रात कार्यरत असणाऱ्या कलाकारांवर कसा परिणाम झाला याचा वास्तविक आढावा या संशोधन लेखांमध्ये स्पष्ट करण्यात आलेला आहे.

**उद्दिष्टे**

१. मालेगाव शहरातील कलावंतांची कोविड कालावधीतील परिस्थिती अभ्यासणे.

२. मालेगाव शहरातील कला-मनोरंजन क्षेत्राची सद्यस्थिती स्पष्ट करणे.

**संशोधन पद्धती**

प्रस्तुत संशोधन निबंधाकरिता माहिती संकलीत करण्यासाठी प्राथमिक माहिती साधनांचा वापर केलेला आहे. यासाठी मालेगाव शहरातील कलावंतांना प्रत्यक्ष भेटून त्यांच्या मुलाखती घेतल्या. तसेच निरीक्षण तंत्रांची देखील माहिती प्राप्त करण्यासाठी वापर करून घेतलेला आहे. प्राप्त माहितीच्या स्पष्टीकरणासाठी वर्णनात्मक पद्धतीचा उपयोग केलेला आहे. यामुळे मालेगाव शहरातील कला-मनोरंजन क्षेत्राची व या क्षेत्रात कार्यरत असलेल्या कलावंतांची कोरोना काळातील वास्तव परिस्थिती स्पष्ट करणे शक्य झाले आहे.

**स्पष्टीकरण**

कला-मनोरंजन क्षेत्राची जागतिक ख्याती आहे. म्हणून युरोप-अमेरिकेत या क्षेत्राला हॉलिवूड असे संबोधले जाते. भारतात मायावी नगरी अशी ओळख असलेल्या मुंबई नगरीतील कला-मनोरंजन क्षेत्राला 'बॉलिवूड' असे संबोधतात. दक्षिण भारतातील कला-मनोरंजन क्षेत्रात 'टॉलिवूड' या नावाने संबोधतात. तर मालेगावात तयार होणाऱ्या सिनेमा, नाटक (कला-मनोरंजन क्षेत्राला) 'मॉलीवूड' असे संबोधतात. 'मालेगाव के शोले' आज चित्रपट संपूर्ण महाराष्ट्रातील सिनेमा रसिकांना परिचित आहे. मालेगावात कला-मनोरंजन क्षेत्रात व्यवसायिक दृष्टीने कार्यरत असणाऱ्या कलाकारांची संख्या दीड हजारांपेक्षा अधिक आहे. चित्रपट, वेबसीरिज, नाटक, एकांकिका, काव्य, कथा, पटकथा, लेखक, वादकवृंद असे विविध कला - मनोरंजन क्षेत्रात हे सर्व कलाकार व्यस्त असतात. या कलाकारांमुळे मालेगाव तालुक्याने एक वेगळीच ओळख निर्माण केलेली आहे. शहरात लोकसंख्येचा विचार केला असता ७०% मुस्लिम समुदाय आहे व इतर सर्व समुदाय 30% मध्ये येतो. परंतु कला-मनोरंजन क्षेत्रात सामाजिक बांधिलकी जोपासली जाते. कारण कलाकारांचा कोणताही धर्म नसतो, जात नसते की, पंत नसतो. कलाकारांच्या दृष्टीने कला हेच सर्वस्व असते. कला ही एक साधना असते. कलाकारांच्या दृष्टीने कला हेच जीवन असे प्रत्यय मालेगावातील सर्व जाती धर्माच्या कलावंतांमध्ये बघायला मिळतो.

मालेगावातील कलावंतांच्या आर्थिक परिस्थितीचा आढावा घेतला असता, बहुतांश कलाकार हे दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील आहेत. हे वास्तव सत्य या संशोधन निबंधाच्या माध्यमाने बघायला मिळते.



Scanned by CamScanner

मालेगावातील प्रसिद्ध कथा, पटकथा लेखकांशी चर्चा करताना असे समजते की, दारिद्र्य कलेला अडथळा नाही तर चार वित पोटाची खळगी जेव्हा भरत नाही तेव्हा पोट हेच कलेचा मोठा अडथळा आहे असे स्पष्ट झाले. मालेगावात कलावंत आहे पण कलेला आर्थिक पाठबळ पुरेशे मिळत नाही. यामुळे कलाकार हा आर्थिकदृष्ट्या सक्षम होत नाही. एकंदरीत येथे निर्माण होणारे चित्रपट अत्यल्प खर्चात तयार करण्याचा प्रयत्न निर्माते करतात. यामुळे कलाकारांना केवळ किमान आवश्यक गरजा पूर्ण करता येतील एवढ्याच तुटपुंज्या मानधनावर काम करावे लागते. हे मॉलीवूडचे वेगळेच वैशिष्ट्य मानावे लागेल. म्हणजेच मालेगाव शहरातील बहुतांश कलाकार गरिबीच्या परिस्थितीत आपला चरितार्थ भागवतात. मात्र जनतेच्या चेहऱ्यावर हास्य फुलवण्याचे अत्यंत महत्त्वाचे काम कलावंत करताना दिसतात. त्यांना शासनाकडून कोणत्याही प्रकारची मदत दिली जात नाही. तसेच स्थानिक महानगरपालिका प्रशासनाकडून देखील कोणत्याही प्रकारचे सहाय्य केले जात नाही. ही या कलाकारांची शोकांतिका आहे.

मालेगाव शहरातील कलाकारांच्या शोकांतिकेत भर घातली ती कोविड- १९ या संसर्गजन्य विषाणूने. मालेगाव शहरात पहिला कोरोना रुग्ण एप्रिल महिन्यात आढळून आला. एप्रिल २०२० मध्ये मालेगावात कोरोना रुग्णाचा मृत्यू देखील झाला. या घटनेची संपूर्ण भिती मालेगाव शहरात होती. यातच दुर्दैव असे की, देशात कडकडीत लॉकडाऊन सुरू असल्याने जनजीवन पूर्णपणे ठप्प झाले होते. याचा प्रतिकूल परिणाम मालेगाव शहरातील कलागुणांनी समृद्ध असलेल्या कलाकारांवर बघायला मिळाला. यात वास्तव सत्य असे की, देशात पहिला लॉकडाऊन घोषित झाला तेव्हापासून अध्याप चित्रीकरण पूर्णपणे बंद आहे. यामुळे मालेगावातील कलावंत जे जनतेच्या चेहऱ्यावरील नैराश्य घालवतात, हास्य फुलवतात त्या सर्व कलाकारांच्या जीवनात नैराश्य आहे. त्यांच्या चेहऱ्याचे हास्य निराशेत झालेले आहे. कोणतेही संकट किंवा आव्हान हे नवीन संधी घेऊन येत असते असे म्हटले जाते. मात्र मालेगावातील कलावंताशी चर्चा केली असता कोरोना संकटाने मालेगावातील कला - मनोरंजन क्षेत्रातील संधी जवळजवळ संपुष्टात आणली आहे असे या कलावंतांचे एक मत तयार झालेले आहे.

देशाप्रमाणेच मालेगाव शहरात देखील कोरोनाची दुसरी लाट येऊन गेलेली आहे. दुसऱ्या लाटेत मालेगाव तालुक्यात शेकडो नागरिकांना आपल्या जीवनाला मुकावे लागले. यात मालेगाव शहरातील काही कलावंतांचा, कलावंतांच्या कुटुंबातील सदस्यांचा समावेश होतो. मात्र आर्थिक परिस्थिती पुढे हतबल झालेल्या कलाकारला हे पर्वतासमान दुःख पेलवण्याची क्षमता नसताना देखील सहन करताना दिसतो आहे. त्याच्या डोळ्यात अश्रू नाहीत. कारण डोळ्यातील अश्रूच आटूण गेलेले आहे. मात्र एक आशावाद या कलावंतांच्या हृदयात आहे की, "जातील हे देखील दिवस' केवळ भविष्याच्या दिशेने डोळे उघडून हे कलाकार कला सादर करण्याची अनोखी संधी मिळेल एवढाच दुर्दम्य आशावाद या कलावंतांमध्ये आढळून येतो.

निष्कर्ष

मालेगावच्या 'मॉलीवूड'मध्ये कार्यरत असणाऱ्या कलावंतांच्या जीवनात कोविड-१९ च्या संसर्गामुळे नैराश्य आलेले आहे. अनेक प्रकारच्या आर्थिक अडचणींचा सामना एक कलावंत करीत आहे. मात्र शासन किंवा प्रशासन कलावंतांना कोणत्याही प्रकारची मदत किंवा सहाय्य देत नाही यामुळेच कलावंतांच्या विवंचनेत मोठ्या प्रमाणात वाढ झालेली आहे.

संदर्भ

१. httpshttps://lokmat.news18.com-13 मार्च २०२०
२. www.loksatta.com – 13 जुलै २०२१
३. https://mr.m.wikipedia.org – 29 जानेवारी २०२०
४. www.bbc.com – 24 मार्च २०२१



Scanned by CamScanner